Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# बौद्ध तत्त्वज्ञान, बौद्ध शिक्षणव्यवस्था आणि वर्तमान

**विपुल मधुकर इंगळे**
पी.एचडी संशोधक
vipul.ingle358@gmail.com

**धम्मपाल जाधव**
पी. एचडी संशोधक
ashudhamma77@gmail.com

जागतिक तत्त्वज्ञानाचा इतिहास हा काही मागील एका सहस्त्रकात उदयाला आलेला नसून तो समजून घ्यायचा असल्यास आपल्याला दोन ते अडीच हजार वर्षांपासून चालत आलेली तत्त्वज्ञानाची परंपरा अभ्यासावी लागेल. प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश हा 'बौद्ध धम्मतत्वज्ञान आणि बुद्धकालीन शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे' हा आहे. तसेच त्यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधात गौतम बुद्धांनी सांगितलेल्या मुक्तिदायी मार्गाचा आढावा घेण्यात आला असून आधुनिक शिक्षणासाठी उपयोगी असणाऱ्या पद्धतीचा उल्लेख प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित शिक्षण व्यवस्था या पद्धतीतून साकारेल का.? याचीही चर्चा प्रस्तुत शोधनिबंधात केली गेली आहे.

**महत्वाची शब्दावली** - गौतम बुद्ध, तत्त्वज्ञान, शैक्षणिक पद्धत, मुक्तीदायी मार्ग.

**प्रस्तावना :**

जागतिक तत्त्वज्ञानाचा इतिहास अवघ्या पाच-सहा वाक्यात जरी सांगावयाचा झाला तरी त्यामध्ये काही महनीय व्यक्तींचा नामोल्लेख केल्याशिवाय आपल्याला समोर जाताच येणार नाही. अशाच महनीय व्यक्तींपैकी एक श्रेष्ठ नाव म्हणजे 'तथागत गौतम बुद्ध' हे होय. गौतम बुद्धांशिवाय जागतिक तत्वज्ञान पूर्ण होऊच शकणार नाही. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

बौद्ध तत्त्वज्ञानामुळे आणि त्यावर आधारित शिक्षण व्यवस्थेमुळे भारतात कला व्यापार आदी क्षेत्रात विकास किंवा भरभराट झाली. व भारत ज्ञानाच्या जोरावर विश्वाचा ज्ञानगुरू होऊ शकला. नालंदा, तक्षशिला यासारख्या तत्कालीन जागतिक विद्यापीठात शिक्षणासाठी जगभरातील विद्यार्थी भारतात येत असत. या माध्यमातून बौद्ध तत्त्वज्ञान व बौद्ध धम्म जगभर पोहोचला. त्यांनी त्यांच्या स्थानिक संस्कृतीनुसार समायोजन साधून बौद्ध तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून यातून आपला व आपल्या देशाचा विकास साधला. परंतु भारतात मात्र प्रतिक्रांतीत बौद्ध धम्म व तत्वज्ञान लुप्त झालेले दिसते. पुढे प्रकांड पंडित भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मधल्या प्रतिक्रांतीच्या काळात बौद्ध धम्मातील झालेली भेसळ दूर सारून, मूळ विज्ञानवादी बौद्ध धम्म नव्याने जगासमोर मांडला. त्यालाच 'नवयान बौद्ध धम्म' म्हणून ओळखले जाते. या तत्त्वज्ञानानुसार आर्य सत्य हे बौद्ध धम्मातील मूळ गाभा आहेत.

ती चार आर्य सत्य समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**आर्य सत्य :**

**१) दुःख :**

जगात सर्वत्र दुःख आहे. व्याधी, मृत्यू या दुःखाने सर्व जग दुःख आहे.

**२) दुःख समुदाय :**

दुःखाचा उदय जेथून होतो त्यास दुःख समुदाय म्हणतात. ती तृष्णा आहे. तृष्णा ही तीन प्रकारची असते. अ) भव तृष्णा ब) विभव तृष्णा क) काम तृष्णा.

**३) दुःख निरोध :**

दुःखाचा नाश करायचा असेल तर . तृष्णेपासून मुक्त होणे आवश्यक आहे. तृष्णेचा त्याग करणे म्हणजेच दुःख निरोध.

**४) दुःख निरोध गामिनी प्रतिपदा :**

दुःख नष्ट करण्याचा मार्ग म्हणजे दुःख निरोध गामिनी प्रतिपदा होय. आर्य सत्य हा मार्ग निर्वाणप्राप्तीचा मार्ग आहे यालाच आर्यअष्टांगिक मार्ग असे म्हणतात.

**आर्य अष्टांगिक मार्ग :**

१) सम्यक दृष्टी २) सम्यक संकल्प ३) सम्यक वाचा ४) सम्यक कर्म ५) सम्यक अजीविका ६) सम्यक व्यायाम ७) सम्यक स्मृती ८) सम्यक समाधी.

**पंचशील :**

१) हिंसा करणार नाही.

२) चोरी करणार नाही.

३) कामवासनेपासून अलिप्त राहणे.

४) असत्य बोलणार नाही.

५) मद्य प्राशन करणार नाही.

**स्त्रियांना संघात प्रवेश :**

तथागत बुद्धांनी जगात सर्वप्रथम स्त्रियांना आपल्या संघात समान स्थान दिले. तथापि प्रारंभी बुद्धांनी स्त्रियांना संघात प्रवेश दिला नव्हता. यासाठी बुद्धावर तो स्त्रीविरोधी होता अशी टीका पण केली जाते. परंतु ती निरर्थक आहे. कारण बुद्धांनी हा नकार स्त्री-पुरुषातील विषमतेवर आधारित दिला नव्हता, तर तो व्यावहारिक कारणांमुळे दिला होता.

**सर्व थरातील लोकांना दीक्षा :**

ज्ञानाची, धर्माची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गापर्यंत होती. ती नाकारून बुद्धांनी समाजातील सर्व थरातील लोकांना आपल्या संघात प्रवेश देऊन ज्ञानाचे, सत्तेचे, धर्माचे सार्वत्रिकरण केले.

बौद्ध धम्म हा विज्ञानावर आधारित आहे. त्याद्वारे काही नियम किंवा आचार देखील आपल्याला पाहायला मिळतात.

**ईश्वर स्वर्ग नरक या संकल्पना अमान्य :**

आत्मा अमान्य परंतु पुनर्जन्म मान्य (पुनर्जन्म हिंदू धर्माप्रमाणे नाही) वर्णव्यवस्था जातीव्यवस्था अशा सर्व शोषण व्यवस्थांना नकार. स्वातंत्र्य समता बंधुता न्याय या तत्त्वांचा पुरस्कार. लोकशाही व्यवस्थेचे उद्गाते.

**बौद्ध शिक्षण प्रणाली :**

भारतासारख्या राष्ट्रात आज सुद्धा वर्णनव्यवस्था, जातीव्यवस्था प्रभावीपणे कार्य करते. एक प्रकारची जाती व्यवस्थेची उतरण ही एका वर्गापुरतीच किंवा धर्मापुरतेच असल्याचे आजही लक्षात येते. तेव्हा अडीच हजार वर्षापेक्षा जास्त काळापूर्वी या शोषण करणाऱ्या व्यवस्थेला सुरुंग लावून, ज्ञानाची मक्तेदारी सार्वत्रिक करण्याचे कार्य किती क्रांतिकारक होते याचा अंदाज करता येतो. आजच्या शिक्षण पद्धतीमधील विविध बाबी या बौद्ध शिक्षणाची आणि तत्त्वज्ञानाची देणगी आहेत. त्यामुळेच बौद्ध काळातील भारत विश्वाचे नेतृत्व करत होता.

**विचार स्वातंत्र्य :**

शिकण्यात, शिकवण्यात आणि संशोधनात असलेले विचार स्वातंत्र्य हे बौद्ध शिक्षण पद्धतीतील सर्वात महत्त्वाची बाब आहे. कालामसुत्तात (अंगुत्तर निकाय केसमुतीसुत्त -१:३:७:५) भगवान बुद्ध म्हणतात ' एखादी गोष्ट मी सांगितली म्हणून, ती परंपरागत आहे म्हणून, फक्त बघितली वा ऐकली म्हणून, आपल्या विचाराला अनुकूल आहे म्हणून स्वीकारू नका तर ती तुमच्या तर्काच्या पातळीवर तपासून स्वतः तुम्ही त्या गोष्टीचा अनुभव घ्या व त्यानंतरच ती स्वीकारायची किंवा नाही ते ठरवा.

**बौद्ध शिक्षणाचे प्रयोजन :**

बौद्ध शिक्षणाचे अंतिम ध्येय म्हणजे व्यक्तीला सर्व बंधनापासून (दैवी व मानवी) मुक्त करणे. ही मुक्ती प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या प्रयत्नाने व गतीने करावयाची आहे. त्यामुळे शिक्षक हा फक्त मार्गदर्शक आदर्श असतो.

शिक्षण हे स्वतःला जाणण्यासाठी म्हणजेच स्वतःची मुक्ती प्राप्त करण्यासाठी असते. धार्मिक जीवनाचे सुद्धा हेच अंतिम ध्येय आहे. व्यक्तीची स्वतःची मुक्ती कशी होते ते त्याच्या स्वतःच्या अनुभूतीची वा स्वतः अनुभवलेली मालिका असते. ती दुसऱ्या व्यक्तीला लागू पडत नाही यासाठी लागणारा वेळ व त्याचे तंत्र सुद्धा व्यक्तिनिष्ठ असते.

**शिक्षक विद्यार्थी नाते :**

बौद्ध शिक्षण पद्धतीत सर्वार्थाने वेगळे असणारे गुरु शिष्य हे नाते बघायला मिळते.

१) शिक्षक हा विद्यार्थ्याला मदत करणारा मार्गदर्शक आहे. तो त्याचा आदर्श असतो. उपदेशापेक्षा शिक्षकाने स्वतःचे उदाहरण इतरांसाठी ठरावे हे शिकवण्याचे उत्तम माध्यम आहे.

२) शिष्याने गुरुजी प्रत्येक बाबतीत सहमत असलेच पाहिजे असे बंधन नाही. त्याचप्रमाणे शिष्य आणि गुरूला सर्वज्ञानी असे मानलेच पाहिजे असेही बंधन नाही.

३) भगवान बुद्धांनी विनयपिटिकात म्हटले आहे की, "विद्यार्थ्याने स्वतः मिथ्या धर्म धारण करणाऱ्या किंवा दुसऱ्यांना मिथ्या धर्म धारण करायला लावणाऱ्या शिक्षकांशी वाद घातला पाहिजे".

४) बौद्धपरंपरेप्रमाणे शिष्याने गुरुला मान देऊन त्यांच्याशी आदराने वागावे. गुरु शिष्य संबंध ही मुलाच्या आणि आई-वडिलांच्या नात्याप्रमाणे असावे. मग गुरु वयाने लहान असो वा शिष्य वयाने मोठा असो.

अशा तऱ्हेने गुरु शिष्याचे संबंध हे शिक्षणासाठी व संशोधनासाठी प्रसन्न व आल्हादायक वातावरणाची निर्मिती करणारे होते.

**अभ्यासक्रम :**

अभ्यासक्रम हा बौद्धांपुरताच मर्यादित नव्हता. तेथील शैक्षणिक अभ्यासक्रम हा बौद्ध, ब्राह्मणी, धार्मिक आणि लौकिक किंवा व्यावहारिक तत्त्वज्ञान आणि उपयुक्त शास्त्र तसेच कला, योग, वेद, व्याकरण, भाषा, विज्ञान, खगोलशास्त्र, न्याय आदी सर्वच क्षेत्रात हा अभ्यासक्रम आखण्यात आला होता.

**प्रवेश परीक्षा :**

एक वेगळे असे बौद्ध शिक्षण पद्धतीचे वैशिष्ट्य आपल्याला पाहायला मिळते. नालंदा विद्यापीठाची प्रवेश परीक्षा अत्यंत कठीण असे. ह्यू - एन - स्तग म्हणतो, "प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जुन्या आणि नव्या ग्रंथाचा सखोल अभ्यास केला असला पाहिजे". प्रवेश परीक्षा मौखिक स्वरूपाचे तिचे स्वरूप आताच्या मुलाखतीप्रमाणे होते प्रवेश परीक्षा घेणाऱ्यांना 'द्वारपंडित' म्हटले जाई.

**अध्यापन पद्धती :**

**अ) चर्चा पद्धती :**

नालंदा येथे ही पद्धत खूप प्रचलित होते ह्यु- एन स्तेंग चा चरित्रकार म्हणतो. "शिकत आणि चर्चा करीत त्यांना दिवस फार लहान वाटत असेल दिवसा आणि रात्री एकमेकांना शेतामध्ये एकमेकांना मदत करून पूर्णत्वाकडे जाण्याचा प्रयत्न करीत होते."

तेथे विद्वान आणि विद्यासंपन्न माणसे सर्वसामान्यात मिसळून एकमेकांशी शक्य आणि अशक्य सिद्धांतांवर चर्चा करीत असत. नंतर त्यांच्या मतांच्या सत्यतेबद्दल विद्वानांनी प्रशंसा केल्यावर त्यांच्या शहाणपणाची कीर्ती सर्वत्र पसरत असे."

परदेशी विद्यार्थी तेथे येऊन त्यांच्या शंकांचे निरसन करून घेत असत आणि अशा तऱ्हेने ते प्रसिद्ध पावत असत.

**ब) वादविवाद :**

शास्त्रीय विषयांवर वाद विवाद घडवून आणले जात. त्यातून विषयांचे आकलन चांगल्या प्रकारे होत असे.

**क) व्याख्या पद्धती :**

ज्ञानसंपादनात कोणताही अभाव राहायला नको. परिपूर्ण ज्ञान झाल्यानंतर त्या विषयासंबंधीच्या व्याख्या विद्यार्थ्यास करता याव्यात अशी अपेक्षा होती.

**ड) तज्ञ विद्वानांची व्याख्याने :**

विविध विषयांमध्ये तज्ञ असणाऱ्या विद्वानांची व्याख्याने विद्यापीठांमध्ये आयोजित करण्यात येत असत. त्याद्वारे विपुल प्रमाणात ज्ञानाचे संपादन करता यायचे. ही व्याख्याने अत्याधिक उपयुक्त ठरत असत.

**ई) व्याख्यान पद्धती :**

नालंदा विश्वविद्यालयात व्याख्यान पद्धतीद्वारा अधिकांश प्रमाणात ज्ञानदान करण्यात येत असे. सोबतच पाठांतर, स्मरण पद्धती, स्मरण केलेल्या ज्ञानाचे संग्रह पद्धती, संग्रहित ज्ञानाचे धारणा, कला शिक्षणासाठी तज्ञांच्या हाताखाली उमेदवारी करण्याची पद्धती अशा काही पद्धतींचा उपयोग ज्ञानार्जनासाठी होत असे.

**शिक्षण आणि शिस्तीची पातळी :**

बौद्ध शिक्षण पद्धतीतील शिक्षणाची आणि शिस्तीची पातळी फार उच्च दर्जाची होती. हयू ली म्हणतो, "नालंदा विद्यापीठात सर्वजण सहजगत्या प्रतिष्ठित आणि गंभीरपणे वागत. नालंदाच्या 700 वर्षाच्या इतिहासात नियमानुसार दोषी किंवा नियमाविरुद्ध वागण्याची एकही घटना घडली नाही." त्याकाळी अतिश बौद्धिक पातळीची मान्यता म्हणजे नालंदा विद्यापीठातून शिक्षण घेऊन येणे हे होते. विक्रम शीला बौद्ध विद्यापीठात यशस्वी विद्यार्थ्यांना पंडित ही पदवी दिली जात असे.

**विविधतेत एकता :**

बौद्ध शिक्षण व्यवस्थेची सर्वात लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे तेथे अनेक प्रकारची मते आणि विचारधारा असणारे विद्यार्थी येत असून तेथे बंधूभावाचे जीवन होते. सर्व विद्यार्थी शक्य आणि अशक्य सिद्धांतांवर चर्चा करत. तत्कालीन विषयावर वेगवेगळ्या पद्धतीने वादविवाद होत असत. पण त्यामुळे तेथील शैक्षणिक वातावरणावर किंवा शालीनतेवर तसेच शांततेवर काहीही परिणाम झाला नाही. अशाप्रकारे वैचारिक स्वातंत्र्य या बुद्धाच्या मूलभूत सिद्धांतानुसार बौद्ध शिक्षण व्यवस्थेने त्या काळच्या बौद्धिक मतभिन्नतेला सामोरे जाऊन आपल्यात सामावून घेतले होते.

**निवासी विश्वविद्यालय आणि भोजनाची सोय :**

बौद्ध विद्यापीठे ही प्रामुख्याने निवासी विद्यापीठे होती. उदा. नालंदा विद्यापीठ. तेथे निवासासोबत मोफत भोजनाची सुद्धा सोय होती. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व सोयी मोफत पुरविल्या जात असत परिणामी कसलीही चिंता न करता किंवा त्या गरजा मिळविण्यासाठी वेळ न घालवता ते संपूर्ण दिवस अभ्यासावर लक्ष केंद्रित करत असत.

**वेळापत्रक :**

आधुनिक घड्याळाचा शोध लावण्यापूर्वी अनेक शतके अगोदर नालंदा विश्वविद्यालयात तेथील कार्यक्रम तंतोतंत वेळापत्रकाप्रमाणे होत असत. 'क्लेप्सिद्र ' नावाच्या पाण्याच्या घड्याळानुसार वेळ मोजला जाई.

**लिखित साहित्य व ग्रंथालये :**

हे बौद्ध शिक्षण व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. लेखांच्याद्वारे व नंतर प्रत्यक्ष लिखित ग्रंथातून शिक्षणाचे माध्यम हे व्यवस्थितपणे सांभाळले गेले होते. ग्रंथालय सुद्धा बौद्ध काळापासूनच अस्तित्वात आलेली पाहायला मिळतात. नालंदा विश्वविद्यालयातील ग्रंथालय अतिशय समृद्ध असे ग्रंथालय होते.

अशाप्रकारे बौद्ध शिक्षण पद्धतीच्या बऱ्याचशा शिक्षण पद्धती आपल्या आजच्या शिक्षण व्यवस्थेतही बघायला मिळतात. आणि हेही तेवढेच सत्य आहे की, आजच्या अतिशय भयाग्रस्त, अशांततेच्या, भावनाशून्य, युद्धजन्य जगाला फक्त बुद्ध विचार आणि वैचारिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी मानवाला प्रधान मानणारी बौद्ध शिक्षण प्रणाली तारू शकते.

**समारोप :**

मागील सहस्त्रकात भारतीय तत्त्वज्ञानाचा जो इतिहास राहिलेला आहे त्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतलेला आहे. बौद्धकालीन शिक्षण व्यवस्था ही परलौकिक जीवनातील मुक्तीपेक्षा इहवादी व्यवहारावर अधिक भर देणारी होती. यातून व्यक्तीच्या सारासार व भौतिक विकासावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले होते. आज आपण पाहत असलेला भौतिक विकास त्या काळात विकसित झालेल्या तार्किक पद्धतीवरच अवलंबित असल्याचे आपल्याला दिसते. आधुनिक विद्यापीठांमध्ये प्रवेश पूर्व परीक्षा त्यातून विद्यार्थ्यांच्या सामाजिक शैक्षणिक वर्तनाची तपासणी केल्या जाते. याचा आधार आपल्याला त्या काळात पहावयास मिळतो. कोणत्याही शिक्षण पद्धतीचे मूळ आपल्याला शोधणे आजच्या काळात गरजेचे आहे. त्याचा इतिहास तपासून पहावयाचा असेल तर बौद्धकालीन शिक्षण व्यवस्था अभ्यासावी लागणार आहे.

**संदर्भ:**

१) सांगळे सी. आर. प्राचीन भारतीय बौद्ध विद्यापीठे, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.

२. मोरे मा. शं., बौद्ध शिक्षण पद्धती, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद.

३. पाल डी. आर. बौद्धदर्शन मे शिक्षा की स्थिती विस्तार, वर्तमान मे प्रासंगिकता.

४. आंबेडकर. बी. आर.बुद्ध आणि त्यांचा धम्म, सुगत प्रकाशन.

५. गुप्ता. राजेश सी. बौद्ध दर्शन घेऊन प्राचीन भारतीय शिक्षा पद्धती.

६. उपाध्याय भरत सिंह, बुद्ध और बौद्ध साधक